# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☏(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune.dte@gmail.com संकेतस्थळ : ww.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/संवि/2016/4577 दिनांक : 11 NOV 2016

प्रति,

प्राचार्य,

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था, पुणे विभाग

विषय :- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति (EBC) योजने बाबत (२०१५-१६).....

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक टीईएम -2015/प्र .क्र.219/तांवि-4 दिनांक ३१ मार्च, २०१६

२. शासन निर्णय क्रमांक टीईएम-2016/प्र.क्र.501/ तांशि-4 दिनांक १३/१०/२०१६

महाराष्ट्र शासनाने राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजना (EBC) राबविणे संदर्भात उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय निर्गमित केले आहेत. यापैकी उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति (EBC) योजनेच्या प्राधिकृत अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (Website) सदर योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांची यादी प्रकाशित करणेबाबत नमुद केले आहे.

या अनुषंगाने या कार्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिताची शिक्षण शुल्क प्रतिपुर्तिची रक्कम मंजुर करुन विद्यार्थ्यांना वाटपाकरीता संस्थेच्या बँक खात्यामध्ये ट्रान्स्फर केले आहेत. तसेच सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये तातडीने ट्रान्स्फर करण्याबाबत सुचित केले आहे. तसेच शिक्षण शुल्क प्रतिपुर्तिची रक्कम सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये तातडीने ट्रान्स्फर केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचित केले आहे.

याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, तसेच सदर उपयोगिता प्रमाणपत्र सादर करताना त्यासोबत शिक्षण शुल्क प्रतिपुर्तिची रक्कम मंजुर केलेल्या विद्यार्थ्यांची यादी खाली नमुद केल्याप्रमाणे सादर करावी.

१. संस्थेच्या लॉगिनमधुन कंपोझिट रिपोर्टमधील विद्यार्थ्यांची संख्या व मंजुर रक्कम या कार्यालयाने मंजुर केलेल्या विद्यार्थी संख्या व रक्कमेशी जुळत असल्याची खात्री करावी.

२. तसेच कंपोझिट रिपोर्टमधुन शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिताची शिक्षण शुल्क प्रतिपुर्तिची रक्कम मंजुर केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रिंट करावी.

३. जर या कार्यालयाने मंजुर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी शिक्षण शुल्क रक्कमेच्या प्रतिपुर्तिसाठी आता पात्र ठरत नसतील अशा विद्यार्थ्यांच्या नावासमोर ५०%शिक्षण शुल्क रक्कम शुन्य (०) दर्शवुन [redacted] त्यांचे नावासमोर तसा शेरा स्पष्टपणे नमुद करावा.

४. सदरची यादी प्राचार्यांच्या / संचालकांच्या सही व शिक्क्यासह **PDF FORMAT** मध्ये स्कॅन करावी. सदर **PDF FILE** ला नाव देताना **DTE INST.CODE+ EBC SANCTIONED STUDENTS** असे द्यावे. (उदा. संस्था कोड 6010 ही संस्था **PDF FILE** ला नाव देताना **6010**EBC SANCTIONED STUDENTS.**PDF** असे नांव देईल)

५. सदर **PDF FILE** या कार्यालयाच्या **ebc.ropune@gmail.com** या इमेल ॲड्रेसवर पाठविण्यात यावी. ईमेल करताना विषयामध्ये **LIST OF EBC SANCTIONED STUDENTS FOR INST.CODE ( DTE INST.CODE)** असे नमुद करावे.

६. सदरची कार्यवाही प्रथम प्राधान्याने करण्यात यावी.

Gaikwad

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे